# 'माझी समृद्ध शाळा' या साधनाविषयी....

## अ) प्रास्ताविक :–

**माझी समृद्ध शाळा** या साधनाद्वारे शाळांनी स्वत:चे मूल्यमापन स्वत: करून आपली शक्तीस्थाने (Strength) तसेच उणिवा (Weakness) जाणून घेणे गरजेचे आहे. शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय अधिकारी या सर्वांनी परस्परांशी विचारविनिमय करून तसेच शाळा व्यवस्थापन समितीशी चर्चा करून आपल्या शाळेच्या प्रगतीसाठी शैक्षणिक उठाव व शासकीय योजनातून भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत, एकेमकांच्या ज्ञानाची व अनुभवांची देवाणघेवाण करून शिक्षकांनी आपल्या स्वत:च्या व्यावसायिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती करून शाळा जास्तीत जास्त समृद्ध होईल, यासाठी **'माझी समृद्ध शाळा'** हे साधन नव्या स्वरूपात विकसित केले असून त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. शाळेच्या विकासाशी संबंधित बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंमलबजावणी संदर्भात शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे.

२. विकासाचे घटक व क्षेत्रनिहाय प्रगतीचे मुद्दे या आधारे शिक्षक व मुख्याध्यापक यांना स्वयंमूल्यमापनाचे साधन उपलब्ध करून स्वयंविकासाकडे नेण्याचा प्रयत्न करणे.

३. शिक्षकांमध्ये आत्मविश्वास व चिकित्सक दृष्टी निर्माण होण्यासाठी जागरूकता निर्माण करणे.

४. शिक्षण प्रक्रिया विद्यार्थी केंद्रित, आनंददायी व रंजक बनविण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक यांना या साधनाद्वारे मार्गदर्शन करणे.

५. शाळेला किंवा वर्गाला मिळालेल्या श्रेणीच्या आधारे सद्यस्थितीचा आढावा घेऊन गुणवत्ता विकासाला प्रेरणा देणे.

६. शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी गरजाभिमुख प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

७. शिक्षकांनी किंवा शाळांनी स्वतः निश्चित केलेल्या श्रेणींची पर्यवेक्षकीय यंत्रणेकडून पडताळणी करून आढळून आलेल्या उणिवा व जाणवलेल्या त्रुटी दूर करणे व मार्गदर्शन करणे यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना एक प्रभावी साधन उपलब्ध करून देणे.

आता हे साधन कसे वापरावे? हे समजून घेऊया.

हे साधन वाचण्यापूर्वी शिक्षकाने आपल्या मनातील समृद्ध शाळा कशी असेल? याचे थोडक्यात वर्णन लिहावे. असे वर्णन लिहिताना आपण पाहिलेल्या शाळा किंवा आपल्या मनातील शाळा यांचा आधार घेता येईल. यानंतर 'माझी समृद्ध शाळा' हे साधन पूर्णपणे वाचावे. तसेच शाळेमध्ये व केंद्रसंमेलनामध्ये यांपैकी प्रत्येक निकषावर चर्चा करावी.

## ब) 'माझी समृद्ध शाळा' या साधनाची रचना :-

१. या साधनाची मांडणी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे सर्वमान्य पुढील ४ पैलू डोळ्यांसमोर ठेवून केलेली आहे.

- पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा (Access)
- लोकसहभाग (Community participation)
- शैक्षणिक संधीची समानता (Equity)
- शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन (Quality)

२. प्रत्येक क्षेत्रामध्ये समाविष्ट विकास घटक व निकष व त्यांना असणारे गुण पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | क्षेत्राचे नाव | विकास घटक संख्या | निकष | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | • पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा (Access) | २१ | ५२ | ८६ |
| २ | • लोकसहभाग (Community participation) | ५ | १४ | २४ |
| ३ | • शैक्षणिक संधीची समानता (Equity) | ६ | १७ | ३३ |
| ४ | • शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन (Quality) | १० | ७९ | १५७ |
| | एकूण | ४२ | १६२ | ३०० |

३. माझी समृद्ध शाळा या साधनाची निर्मिती करताना केलेले बदल :-

- या पुस्तिकेची पूर्वीच्या पुस्तिकेप्रमाणेच चार क्षेत्रांत विभागणी केली आहे परंतु बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार पूर्वीपेक्षा वेगळ्या चार क्षेत्रांत विकास घटकांची विभागणी केली आहे.
- या पुस्तिकेत स्तर संख्या पाच ऐवजी तीन अशी केली आहे.
- स्तरांतील निकषांची मांडणी शक्यतो चढत्या क्रमाने केली आहे.
- निकषांना स्तरनिहाय चढत्या क्रमाने गुण देण्यात आले आहेत.
  'जसे स्तर -१साठी १ गुण, स्तर-२साठी २ गुण व स्तर-३साठी ३ गुण'
- पूर्वीच्या २८ विकास घटकांमध्ये इतर आवश्यक घटक समाविष्ट केल्याने या पुस्तिकेत ४२ विकास घटकांचा समावेश केला आहे.
- विकास घटकांतील सर्व निकष मापनास सुलभ व वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे.
- प्रगतीचे टप्पे लवकर गाठल्याचा आनंद मिळावा म्हणून पूर्वीच्या ५ श्रेणींऐवजी ७ श्रेणींमध्ये विभागणी केली आहे.
- ज्ञानरचनावाद व अध्ययन समृद्धी कार्यक्रमानुसार गुणवत्ता वाढीवर भर दिला असून बौद्धिक (गुणवत्ता) या क्षेत्रासाठी गुणांमध्ये वाढ केली आहे.
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार वाचन, लेखन, गणन या मूलभूत कौशल्यांचा समावेश विकास घटकात केला आहे.

- मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांच्यासाठी स्वतंत्र गुणदान तक्त्यांची योजना केली आहे.
- वर्गसंकलनासह सर्व गुणदान तक्ते स्तरनिहाय देण्यात आले आहेत.
- अ–१ श्रेणी प्राप्त करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष बक्षीस योजना प्रस्तावित केली आहे.

## क) स्वयंमूल्यमापन व श्रेणी निर्धारण :–

आपण आपल्या प्रगतीचे मापन इतरांबरोबर तुलना करून करत असतो. 'माझी शाळा त्यांच्या शाळेपेक्षा अधिक चांगली आहे.' असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा दुसऱ्याशी तुलना करून आपण आपल्या शाळेचे मूल्यमापन करत असतो. 'माझे अध्यापन हे त्या शिक्षकापेक्षा चांगले आहे', इथे आपण दुसऱ्याशी तुलना करत असतो. इथे आपली स्पर्धा दुसऱ्याशी असते. परंतु यापेक्षा 'स्वत:ला ओळखा' हे तंत्र मूल्यमापनासाठी अधिक प्रभावी ठरते. आपण काल कोठे होतो? आणि आज कोठे आहे? याचे आकलन करून घेणे म्हणजे स्वत:च्या प्रगतीचे मूल्यमापन स्वत: करणे होय. यालाच आपण स्वयंमूल्यमापन म्हणतो. या ठिकाणी आपली स्पर्धा आपल्याशी असते. स्वयंविकासासाठी स्वयंमूल्यमापन हेच साधन अतिशय महत्त्वाचे आहे.

आपण आपले, आपल्या अध्यापनाचे, आपल्या शाळेचे मूल्यमापन स्वत:च करू लागलो तर आपण कोठे कमी पडतो, कोठे सुधारण्यासाठी वाव आहे याचा विचार करून प्रयत्न करू शकतो. या प्रयत्नातून आपण काल कोठे होतो व आज कोठे आहोत? हे अजमावता येते. म्हणून 'माझी समृद्ध शाळा' हे साधन स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासाकडे जाण्याचा एक मार्ग आहे.

### स्वयंमूल्यमापन केव्हा व कसे करावे?

१. पहिले स्वयंमूल्यमापन माहे सप्टेंबरच्या अखेरीस करावे. विकास घटक ४२ साठी गुणदान गत वर्षाच्या सत्र दोन मधील विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय प्राप्त श्रेणींच्या आधारे करावे. उदा. इ. तिसरीच्या वर्गशिक्षकाने आपल्या वर्गात असलेल्या मुलांचा गतवर्षीचा म्हणजेच इ. दुसरीच्या सत्राच्या अखेरीस प्राप्त श्रेणींचा विचार करावा.
   - इयत्ता पाचवी व आठवीमध्ये नवीन दाखल मुलांचा तसेच वर्गवार नवीन दाखल मुलांच्या प्रगतिपुस्तकातील श्रेणींचा विचार करावा.
   - इयत्ता पहिलीच्या वर्गशिक्षकाने विकास घटक ४२ साठी सप्टेंबर अखेरच्या अभ्यासक्रमावर आपल्या वर्गातील मुलांची मूलभूत कौशल्यामधील प्रगती विचारात घेऊन श्रेणीत वर्गीकरण करावे व गुणदान करावे.

२. दुसरे स्वयंमूल्यमापन माहे डिसेंबर अखेरीस करावे. हे स्वयंमूल्यमापन सत्र एक मधील विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय प्राप्त श्रेणीच्या आधारे करावे.

३. तिसरे स्वयंमूल्यमापन माहे एप्रिल अखेरीस करावे. हे स्वयंमूल्यमापन सत्र दोन मधील विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय प्राप्त श्रेणीच्या आधारे करावे.

- **बहुवर्ग अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी आपल्याकडील वर्गाचे गुणांकन करण्यासाठी तक्ता क्र. ३ च्या छायांकित प्रती वापराव्यात.**

**शाळेसाठी व वर्गासाठी गुणांकन व श्रेणी निश्चिती :-**

प्रत्येक विकास घटकाच्या प्रत्येक स्तरामध्ये निकषांची यादी दिलेली आहे. काही निकषांमध्ये एकापेक्षा अधिक बाबींची अपेक्षा केलेली आहे. त्या सर्व बाबी पूर्ण असल्या तरच त्या निकषासाठी असलेला गुण घ्यावा. उदा. क्षेत्र-पायाभूत सुविधा- विकास घटक १.शाळा इमारत मधील स्तर १ मध्ये पुढील तीन बाबींची अपेक्षा केली आहे.

- शाळा इमारतीमध्ये प्रत्येक शिक्षकांकरिता स्वतंत्र वर्गखोली उपलब्ध आहे.
- मुख्याध्यापक खोली/ कार्यालय उपलब्ध आहे.
- अग्निशमन यंत्रणा उपलब्ध असून वापरण्यास योग्य आहे.

या सर्व बाबींची पूर्तता असेल तर या निकषासाठी असलेला १ गुण घ्यावा.

**जे विकास घटक आपल्या शाळेस सद्यस्थितीत लागू नसतील तेथे शाळेने पूर्ण गुण घ्यावेत.**

- **तक्ता क्र.१-विकास घटक निहाय व स्तरनिहाय गुणविभागणी** - या तक्त्यामध्ये विकास घटक निहाय व स्तरनिहाय गुणविभागणी दिलेली आहे. हा तक्ता वाचल्यानंतर साधनांचा आराखडा, गुणविभागणी आणि वर्ग व शाळेचे श्रेणी निकष दृष्टिक्षेपात येतील.
- **तक्ता क्र.२-विकास घटक गुणसंकलन-मुख्याध्यापकांसाठी** हा तक्ता मुख्याध्यापकांसाठी असून त्यामध्ये विकास घटक क्र.१ ते २६ दिलेले आहेत.
- **तक्ता क्र.३-विकास घटक गुणसंकलन-शिक्षकांसाठी** हा तक्ता वर्गशिक्षकांसाठी असून त्यामध्ये विकास घटक क्र.२७ ते ४२ दिलेले आहेत. हा तक्ता भरताना शाळेत इ.१ ते ८ मधील जेवढे वर्ग आहेत, तेवढ्या वर्गांचे गुणांकन त्या त्या वर्गाच्या शिक्षकांनी करावे. त्या आधारे वर्गाची श्रेणी वाढविण्यासाठी नियोजन करावे.
- **तक्ता क्र.४-वर्ग संकलन तक्ता** हा तक्ता वर्ग संकलनासाठी असून शाळेतील सर्व वर्गांच्या क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय एकूण गुणांची नोंद या तक्त्यात लिहून सरासरी गुण काढावेत.
- **तक्ता क्र.५-अ-क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय शाळा गुणनोंद संकलन** हा तक्ता शाळेचा क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय गुणनोंदीसाठी असून यामध्ये क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय शाळेचे एकत्रित गुण (तक्ता क्र. २ मधील एकूण गुण व ४ मधील सरासरी गुण) लिहावेत व शाळेची श्रेणी निश्चित करावी. त्या आधारे शिक्षकांशी सहविचार सभेत शाळा सुधारण्याविषयी नियोजन करावे. **सदर तक्त्याची प्रत केंद्रप्रमुखांकडे द्यावी.**
- **तक्ता क्र.५ -ब -क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय शाळा गुणनोंद संकलन (पडताळणी प्रपत्र)** हे प्रपत्र पर्यवेक्षकीय यंत्रणेला पडताळणीसाठी दिले आहे. पर्यवेक्षकीय यंत्रणा त्यांच्या अधिनस्त शाळांची पडताळणी करणेबाबत कालमर्यादित नियोजन करून पडताळणी करेल. शैक्षणिक वर्षात प्रत्येक शाळेची तीन वेळा पडताळणी व्हावी.
- **तक्ता क्र.६-केंद्रातील शाळांची संकलित गुणनोंद** हा तक्ता केंद्रप्रमुखांसाठी असून या तक्त्याच्या आधारे केंद्रातील शाळांची क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय गुणनोंद करून संकलित अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवावा. केंद्रसंमेलनात शाळांमध्ये अधिक प्रगती साधण्यासाठी चर्चा घडवून आणावी व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे.
- **तक्ता क्र.७-तालुका/उसाके/जिल्हा संकलन तक्ता** हा तक्ता गटशिक्षणाधिकारी, उन्नत साधन केंद्र-प्रमुख, शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांच्यासाठी असून त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील केंद्रप्रमुखांच्या/ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या/गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या माहितीच्या आधारे भरावा. त्या आधारे श्रेणीनिहाय संख्या वरिष्ठ कार्यालयास कळवावी.

## ड) पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी साधनाची उपयुक्तता

हे साधन शिक्षक व शाळा यांच्या स्वयंमूल्यमापनासाठी जरी असले तरी पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी उपयुक्त असे आहे. सध्याच्या पर्यवेक्षण पद्धतीमध्ये, शाळाभेटीमध्ये अथवा शाळा तपासणीमध्ये व्यक्तिनिष्ठतेचा प्रभाव पडण्याची अधिक शक्यता असते. एकाच वर्गाचे/शाळेचे/शिक्षकाचे मूल्यमापन वेगवेगळ्या पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी केले तर त्यांच्यामध्ये विविधता आढळून येते. ही विविधता कमी करून मूल्यमापनामध्ये वस्तूनिष्ठता आणण्यासाठी पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी या साधनाचा उपयोग करणे अपेक्षित आहे. तसेच या साधनामध्ये शैक्षणिक गुणवत्तेवर अधिक भर दिलेला असल्याने शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

❖ पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी मार्गदर्शक सूचनाः–

१. शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याबरोबर ही पुस्तिका पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी काळजीपूर्वक वाचून क्षेत्र, विकास घटक, निकष व गुण निश्चिती यांचा सखोल अभ्यास करावा.

२. गटसंमेलनामध्ये पुस्तिकेतील निकषांवर शिक्षकांमध्ये चर्चा घडवून आणावी. उल्लेखनीय काम करणाऱ्या शाळांच्या अनुभवांची देवाण घेवाण करावी.

३. शाळा भेटीच्या वेळी मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांना स्तरनिहाय गुणांकन करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन मार्गदर्शन करावे. क्षेत्रनिहाय विविध घटकांमधील ज्या निकषांना शाळेस अथवा वर्गास गुण मिळाले नाहीत, अशा निकषांच्या बाबतीत दिशादर्शक मार्गदर्शन करावे. तसेच अपेक्षित ठिकाणी स्वत: सहभागी होऊन निकष पूर्तीसाठी प्रयत्न करावेत.

४. शाळांनी केलेल्या स्वयंमूल्यमापनाची पडताळणी करताना मांडलेल्या सर्व निकषांचे अभिलेख/अहवाल पाहून गुणदान करावे व प्रपत्र ५–ब भरावे. तक्ता ५–अ व ५–ब मधील गुणांमध्ये तफावत असल्यास मुख्याध्यापक व शिक्षकांशी चर्चा करावी, प्रगतीबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे व संकलित अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवावा.

५. प्रत्येक शाळा भेटीच्या वेळी 'माझी समृद्ध शाळा' या स्वयंमूल्यमापन साधनाचा आढावा घ्यावा व आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा अ–१ श्रेणी मध्ये आणण्यासाठी प्रयत्न करावेत.

# माझी समृद्ध शाळा

## क्षेत्र :- पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा

| अ. क्र. | विकासाचे घटक | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|
| | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| १ | शाळा इमारत | ❍ शाळा इमारतीमध्ये प्रत्येक शिक्षकांकरिता स्वतंत्र वर्गखोली उपलब्ध आहे.<br>❍ मुख्याध्यापक खोली/कार्यालय उपलब्ध आहे.<br>❍ अग्निशमन यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून वापरण्यास योग्य आहे. | ❍ ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली आहे./ पर्यायी व्यवस्था केली आहे.<br>❍ प्रयोगशाळेसाठी स्वतंत्र खोली आहे./ पर्यायी व्यवस्था केली आहे. | — |
| २ | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | ❍ सर्व इमारतीना हँडरेल्ससह रँपची सुविधा आहे.<br>❍ विशेष गरजा असणाऱ्या मुलां-मुलींसाठी कमोड टॉयलेट/कमोड चेअरसह आवश्यकतेनुसार इतर सुविधा उपलब्ध आहेत. | ❍ हँडरेल्स, रँप व टॉयलेटसह इतर सुविधा सुस्थितीत आहेत. | — |
| ३ | स्वच्छतागृह | ❍ शाळेमध्ये मुलांमुलींसाठी निकषां-नुसार पुरेशा पाण्याच्या सुविधेसह स्वतंत्र स्वच्छतागृह आहे. | ❍ सर्व स्वच्छतागृहांची जंतुनाशके वापरून नियमित स्वच्छता ठेवली जात असून त्यांचा नियमित वापर केला जात आहे. | — |
| ४ | स्वयंपाकगृह/ किचनशेड | ❍ शालेय पोषण आहार योजनेसाठी सुरक्षित अंतरावर किचनशेड (स्वयंपाकगृह) उपलब्ध आहे. | ❍ किचनशेडमध्ये पुढील सुविधा व सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.<br>धान्य साठविण्यासाठी कोठी, अन्न शिजविण्यासाठी व वाटपा-साठी भांडी व गॅस सिलेंडर/ शेगडी/चूल इ. | — |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ५ | फर्निचर | अ | ❍ विद्यार्थ्यांकरिता पुरेशा प्रमाणात बस्करपट्ट्या/पाट उपलब्ध आहेत. | ❍ विद्यार्थ्यांकरिता पुरेसे बेंचेस उपलब्ध आहेत. (इ. ५वी ते ८वी साठी) | — |
| | | ब | ❍ मुख्याध्यापकासह शिक्षक संख्येइतके टेबल, खुर्च्या व कपाटे उपलब्ध आहेत.<br>❍ प्रत्येक वर्गखोलीमध्ये लेखन फळा उपलब्ध आहे. | ❍ इतर आवश्यक फलक उपलब्ध आहेत. उदा. कल्प फलक, सूचना फलक, तापमान फलक इ. | ❍ प्रत्येक वर्गखोलीत विद्यार्थ्यांच्या वापरासाठी जमिनीलगतचे फळे आहेत. |
| ६ | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | ❍ पिण्याच्या स्वच्छ व निर्जंतुक पाण्याची कायमस्वरूपी सोय असून पाणी साठविण्यासाठी, शाळेत माठ/पिंप/टाकी इ. उपलब्ध आहेत व पाणी पिण्यासाठी ओगराळे, ग्लास पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. | ❍ पिण्याच्या पाण्याची तपासणी नियमित केली जात असून पाण्याच्या टाकीची स्वच्छता ठेवली जात आहे. | — |
| ७ | विद्युत सुविधा | | ❍ सर्व वर्गखोल्यांमध्ये पुरेशी प्रकाश-योजना व पंखा या सुविधांसाठी मीटरसह विद्युतीकरण केले आहे. | ❍ शैक्षणिक विद्युत उपकरणे वापरण्यासाठी व शालेय परिसरात आवश्यक ठिकाणी (मैदान, स्वच्छतागृह इ.) विद्युतीकरणाची सोय आहे. | — |
| ८ | संरक्षक भिंत | | ❍ शाळेच्या इमारतीस प्रवेशद्वार असून सुरक्षिततेसाठी बांबू/तारेचे इ. कुंपण आहे. | ❍ शाळेच्या इमारतीच्या सुरक्षितते-साठी लोखंडी गेटसह पक्की संरक्षक भिंत आहे. | — |
| ९ | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | ❍ प्रत्येक वर्गखोलीत टोपली/कचराकुंडी उपलब्ध आहे. शाळा परिसरात कचरापेटी उपलब्ध आहे. | ❍ कचऱ्याचे व्यवस्थापन व सांडपाण्याचा निचरा आरोग्य-दायक पद्धतीने करण्याची व्यवस्था केली आहे. | ❍ कंपोस्ट खत/गांडूळखत निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहे. |
| १० | शालेय बाग | | ❍ शाळेच्या आवारात बाग, फिरती/तरंगती बाग तयार केली आहे.<br>❍ बागकामासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. | ❍ बागेतील फुलझाडे, फळझाडे, शोभेची झाडे, तसेच औषधी वनस्पतींचे संवर्धन केले जात आहे. | ❍ बागेमध्ये मुलांना आनंददायी मनोरंजनाचे साहित्य उपलब्ध आहे. घसरगुंडी, झोपाळा, सी-सॉ इ. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ११ | ग्रंथालय | | ❍ ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी किमान ५ पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांचा नियमित वापर होतो.<br>❍ शिक्षकांसाठी संदर्भग्रंथ व अवांतर वाचनासाठी पुस्तके उपलब्ध असून देवघेव रजिस्टर अद्ययावत ठेवले आहे. | ❍ ग्रंथालयात वर्तमानपत्रे, वयानुरूप नियतकालिके, मासिके तसेच ज्ञानकोश, शब्दकोश, विश्वकोश इ. पुस्तके उपलब्ध केली आहेत. | ❍ नवीन व निवडक पुस्तकांच्या परिचयासाठी प्रदर्शनाची व्यवस्था आहे. उदा. पेपर स्टँड, रॅक/ दोरीवरील मांडणी इ. |
| १२ | प्रयोगशाळा | | ❍ प्रयोगशाळा असून सर्व इयत्ता-निहाय आवश्यक प्रयोग-साहित्य उपलब्ध आहे. | ❍ प्रयोगसाहित्याची योग्य देखभाल ठेवली जाते. | — |
| १३ | शाळा सजावट | | ❍ सर्व वर्गखोल्यांमध्ये रंगकाम केले असून शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी बोलक्या भिंती, आवश्यक तक्ते, तरंगचित्रे इत्यादींचा समावेश केला आहे. | — | — |
| १४ | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | अ | ❍ शाळेमध्ये विषयास अनुरूप विविध प्रकारची चित्रे, आलेख,नकाशे, प्रतिकृती तक्ते उपलब्ध आहेत.<br>तक्ते- किमान १२,<br>नकाशे- किमान ४<br>प्रतिकृती- किमान १२ | ❍ शाळेत विषयनिहाय शैक्षणिक साहित्य, संच (विज्ञान, गणित, इंग्रजी किट) इ. साहित्य उपलब्ध आहे. | — |
| | | ब | ❍ विषयनिहाय अध्ययन कोपरे उपलब्ध असून त्यामध्ये विषयनिहाय साहित्याची मांडणी केली आहे. | — | — |
| १५ | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | | ❍ शैक्षणिक अनुभव देण्यासाठी शैक्षणिक कॅसेटसह टु.इन.वन/दूरदर्शन संच/ डिजिटल कॅमेरा /सी.डी./ डी.व्ही.डी. प्लेअर इ. साधने उपलब्ध आहेत. | ❍ इंटरनेट जोडणीसह संगणक/ एल.सी.डी. प्रोजेक्टर उपलब्ध आहे. | — |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| १६ | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | अ | ❍ शाळेमध्ये डफ/डफली, खंजिरी, टाळ, घुंगरू इ. साहित्य उपलब्ध आहे. | ❍ शाळेमध्ये तबला/ढोलकी, हार्मोनिअम इ. साहित्य उपलब्ध आहे. | — |
| | | ब | ❍ कार्यानुभव अंतर्गत क्षेत्रनिहाय निवडलेल्या उपक्रमांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. | — | — |
| | | क | ❍ विद्यार्थी वयोगटांनुसार, अभ्यासक्रमानुसार कवायत, कसरत व खेळासाठी साहित्य उपलब्ध आहे. | — | — |
| १७ | खेळाचे मैदान | | ❍ खेळाचे मैदान उपलब्ध आहे. | ❍ मैदानावरती वैयक्तिक व सांघिक खेळांची क्रीडांगणे आखलेली आहेत. | ❍ खेळाचे मैदान उपलब्ध आहे. (प्रती विद्यार्थी १० चौरस मीटर/ १०० चौरस फूट) |
| १८ | शालेय अभिलेख व दप्तर | | ❍ वार्षिक तपासणी अहवालात नोंद केलेली सर्व रजिस्टर्स शाळेत ठेवलेली असून पृष्ठांकित व प्रमाणित केली आहेत. | ❍ नोंदी अचूक व परिपूर्ण असून अभिलेखे उत्कृष्ट प्रकारे जतन केले जात आहेत. | |
| १९ | वित्तीय व्यवस्थापन | | ❍ शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने गरजेच्या बाबींचा प्राधान्यक्रम ठरवून उपलब्ध निधीचा विनियोग केला जातो व उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केली आहेत. | ❍ खर्चाचा ताळेबंद ठेवला जात आहे. | ❍ अभिलेखांचे लेखा परीक्षण केले आहे. तसेच लेखा आक्षेपांची पूर्तता केली आहे. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|
| | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| २० | मुख्याध्यापक | ❍ मुख्याध्यापकांनी इतर सहकारी शिक्षकांच्या मदतीने शालेय वार्षिक कामाचे नियोजन केले आहे. | ❍ दरमहा शिक्षकांच्या सभा घेऊन अध्ययन अध्यापनात आलेल्या अडचणी, समस्या याबाबत चर्चा करून उपाययोजना केली जात आहे. इतिवृत्त उपलब्ध आहे. | ❍ आठवड्यातून किमान २ शिक्षकांचे पाठ निरीक्षण करून मार्गदर्शन करत आहेत व त्यानुसार लॉगबुकमध्ये नोंदी करत आहेत. |
| २१ | देखभाल दुरुस्ती | ❍ भौतिक सुविधेतील सर्व बाबींची आवश्यकतेनुसार वेळीच दुरुस्ती केली जात आहे. | — | — |

शाळा म्हणजे काही फक्त इमारत नाही किंवा शिक्षक व मुलांनी फक्त एकत्र येण्याची जागा नाही. मुलांच्या शिक्षणासाठी व विकासासाठी ती एक वैशिष्ट्यपूर्ण खास जागा आहे. मुलांच्या विचारांना आकार देणारी, ज्ञानाला साकार स्वरूप देणारी ती जागा आहे. जी त्यांचे कुतूहल जागे करून त्यांना सक्रिय बनवते. ती त्यांच्या मनात प्रश्न निर्माण करते व उत्तरे शोधायला व समस्या जाणून घ्यायला उद्युक्त करते. शाळा मुलांना वातावरणाशी समरस होत भविष्य घडवायला मदत करते.

स्वाभाविकपणे शाळेवर या सर्वांची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळेच शिकणे व शिकवणे हे एक नित्याचे काम न होता एक सर्वांगसुंदर, आनंददायी अनुभव असावा, असे शाळेचे वातावरण असणे महत्त्वाचे आहे. शाळेच्या भौतिक वातावरणात फक्त शाळेची इमारत व त्यातील जागाच येतात असे नाही, तर बाहेरचे मैदान व सुशोभित बगीचा यांचा मुलांचे अनुभव समृद्ध करण्यामध्ये मोलाचा वाटा असतो.

संदर्भ – एका समृद्ध शाळेचा प्रवास (BALA)

# माझी समृद्ध शाळा

## क्षेत्र :- लोकसहभाग

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| २२ | शाळा व्यवस्थापन समिती | अ | ❍ निकषांनुसार शाळा व्यवस्थापन समिती स्थापन केली असून शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण झाले आहे. | ❍ शाळा व्यवस्थापन समितीची दरमहा सभा होते. सभेमध्ये शालेय विकास कामांबाबत चर्चा करून निर्णय घेतले जात आहेत. त्याचे इतिवृत्त उपलब्ध आहे. | ❍ घेतलेल्या निर्णयांची विहित कालावधीमध्ये अंमलबजावणी केली जात आहे. ❍ मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा नियमित आढावा घेतला जात आहे. |
| | | ब | ❍ शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी चर्चा करून त्रैवार्षिक व वार्षिक शालेय विकास आराखडा तयार केला आहे. | ❍ चालू शैक्षणिक वर्षात शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी विकास आराखड्यामध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केली आहे. | — |
| २३ | पालक-शिक्षक संघ | | ❍ पालक शिक्षक संघाची स्थापना निकषांनुसार केली असून दरमहा सभा घेतली जाते. सभेचे इतिवृत्त ठेवले जात आहे. | ❍ विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रमांमध्ये पालक शिक्षक संघाचे सहकार्य घेतले जात आहे. त्याबाबत नोंदी ठेवल्या जात आहेत. | — |
| २४ | माता पालक संघ | | ❍ माता पालक संघाची स्थापना निकषांनुसार केली असून दरमहा सभा घेतली जाते. सभेचे इतिवृत्त ठेवले जात आहे. | ❍ मुलामुलींची उपस्थिती, समस्या, मुलामुलींसाठी विविध शासकीय योजना व गुणवत्ता वाढ इत्यादी मध्ये माता पालक संघाचे सहकार्य घेतले जात आहे. त्याबाबत नोंदी ठेवल्या जात आहेत. प्रगतीचा आढावा घेतला जातो. | — |

| अ. क्र. | विकासाचे घटक | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|
| | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| २५ | शालेय पोषण आहार समिती | ❍ शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार समिती स्थापन केली असून नियमित सभा घेतली जाते. सभेचे इतिवृत्त ठेवले जात आहे. | ❍ शालेय पोषण आहार दर्जेदार व नियमित देण्याविषयीची पाहणी व संनियंत्रण केले जात आहे. त्याबाबत नोंदी ठेवल्या जात आहे. | — |
| २६ | शाळा आणि समाज सहसंबंध | ❍ समाज प्रबोधनासाठी विविध कार्यक्रम, चर्चासत्र उद्‌बोधन वर्ग घेतले जातात. अहवाल उपलब्ध आहेत. | ❍ शैक्षणिक उठावांतर्गत शाळेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी समाजाकडून रोख, वस्तुरूपाने व श्रमदानाने मदत घेतली जात आहे. त्याची नोंद ठेवली जात आहे. | ❍ स्थानिक परिसरा–तील कुशल कारागीर, तज्ज्ञ व अनुभवी व्यक्ती, महिला बचत गट व संस्था इत्यादींचे शालेय अध्यापनात सहकार्य घेतले जात आहे. |

**''आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तीन महत्त्वाच्या गोष्टी आपण समजून घ्यायला हव्यात. पहिली म्हणजे माणसाला इच्छा हवी, महत्त्वाकांक्षा हवी; दुसरी तिचा ध्यास घ्यायला हवा आणि तिसरी म्हणजे ती पूर्ण होईल असा दृढविश्वास हवा.''**

**– डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

## क्षेत्र :- शैक्षणिक संधीची समानता

| अ. क्र. | विकासाचे घटक | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|
| | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| २७ | मुलींचे शिक्षण | ○ दैनंदिन अध्ययन-अध्यापन तसेच अभ्यासविषयक उपक्रम व सहशालेय उपक्रमांत मुला-मुलींचा समान सहभाग घेतला जात आहे व त्याबाबतचे नियोजन उपलब्ध आहे. | ○ स्थानिक परिसरातील विशेष प्रावीण्य मिळविलेल्या मुली, कर्तृत्ववान महिला यांच्या कार्याचा परिचय मुलाखती/भित्तिपत्रिका इ. द्वारे करून दिला जात आहे. त्याची नोंद ठेवली जात आहे. | ○ शाळेत मीना मंच/मीना कॅबिनेट कार्यरत असून त्यांच्यामार्फत विविध उपक्रम घेतले जात आहेत. त्याची नोंद ठेवली जात आहे. |
| २८ | विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे शिक्षण | ○ विशेष गरजा असलेले विद्यार्थी शोधून त्यांची यादी तयार केलेली आहे. त्यांना गरजेनुसार संबंधित तज्ज्ञ व्यक्तींमार्फत संदर्भसेवा पुरविली जात आहे. | ○ विशिष्ट कमतरतेमुळे या मुलांना येणारे अध्ययनातील अडथळे दूर करण्यासाठी नियमित शिक्षक योग्य त्या उपाययोजना करत आहेत. उदा. १. अल्पदृष्टी विद्यार्थ्यास वर्गात पुढे बसविणे. २. कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याकडे पाहून अध्यापन करणे. तसेच या मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत. | ○ विशेष गरजा असणाऱ्या मुलांना सहभागी होता येईल अशा अभ्यास-विषयक उपक्रम व सहशालेय उपक्रमांचे नियोजन केले जात आहे. तसेच इतर मुलांबरोबर या उपक्रमात सहभाग दिला जात आहे. त्याची नोंद ठेवली जात आहे. तसेच या कामी विशेष शिक्षकांची (Special mobile teacher) मदत घेतली जात आहे. या मुलांना शिकवण्यासाठी स्वत: स्वतंत्र पद्धती विकसित करत आहेत. |
| २९ | अनुसूचित जाती/ जमातीतील मुलांचे शिक्षण | ○ अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील सर्व मुलामुलींना त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ वेळेत दिला जात आहे. त्याची नोंद ठेवली जात आहे. | ○ सर्व शालेय कामकाजामध्ये तसेच अभ्यासविषयक उपक्रम व सहशालेय उपक्रमात अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील सर्व मुलामुलींचा समान सहभाग घेतला जात आहे. तसेच त्यांच्या- | ○ शिक्षक विद्यार्थ्यांशी त्यांच्या बोली भाषे-तून संवाद साधून विद्यार्थ्यांना प्रमाणभाषेकडे |

| अ. क्र. | विकासाचे घटक | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|
| | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| | | | कडे असलेल्या वैशिष्ट्य-पूर्ण कौशल्यांची दखल घेऊन अशा उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. | टप्प्याटप्प्यांने वळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या किंवा स्वत: तयार केलेल्या साहित्याचा वापर करत आहेत. |
| ३० | अल्पसंख्याक मुलांचे शिक्षण | ❍ अल्पसंख्याक प्रवर्गांतील सर्व मुलामुलींना त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ दिला जात आहे. | ❍ सर्व शालेय कामकाजामध्ये तसेच अभ्यासविषयक उपक्रम व सहशालेय उपक्रमांत अल्पसंख्याक प्रवर्गांतील सर्व मुलामुलींचा समान सहभाग घेतला जात आहे. | ❍ अल्पसंख्याक समाजातील सण, उत्सव, समारंभ यांचा परिचय इतर मुलांना करून दिला आहे. |
| ३१ | शाळाबाह्य मुलांचे शिक्षण | ❍ सर्वेक्षणानुसार शाळाबाह्य मुले निश्चित केली असून त्या सर्वांना वयानुरूप योग्य इयत्तेत प्रवेश दिलेला आहे. अशा विद्यार्थ्यांच्या विशेष शिक्षणाचे नियोजन केले जात आहे. | ❍ त्यांची विविध विषयांतील अध्ययन स्थिती निश्चित केली आहे व त्यांचा जीवनवृत्तांत अभ्यास (Case Study) विहित नमुन्यात ठेवलेला आहे. | ❍ परिषदेने तयार केलेला विशेष अभ्यासक्रम, शिक्षक मार्गदर्शिका व अध्ययन साहित्य (उदा. शिक्षक मित्र) याचा अभ्यास करून नियमित मुलांच्या-बरोबर संपादणूक पातळीपर्यंत अशा विद्यार्थ्यांना आणले जात आहे. |
| ३२ | स्थलांतरित मुलांचे शिक्षण | ❍ शालेय कार्यक्षेत्रात स्थलांतरित होऊन आलेल्या सर्व मुलांना नियमित शाळेत प्रवेश दिला जात आहे. तसेच शालेय कार्यक्षेत्रातून स्थलांतरित झालेल्या मुलांना हस्तांतरण प्रमाणपत्र व विषयनिहाय प्रगतीच्या नोंदी देऊन त्यांनी प्रवेश घेतल्याची खात्री केली जात आहे. | ❍ अशा प्रकारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला त्याच्या प्रगतीच्या नोंदीच्या आधारे पूरक मार्गदर्शन केले जात आहे. | — |

# क्षेत्र :- शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ३३ | शिक्षक व्यक्तिमत्त्व विकास | अ | ❍ मुख्याध्यापक व शिक्षक शालेय वेळेत नियमित उपस्थित राहत आहेत व कामकाज करत आहेत. | ❍ शिक्षकांचा पोशाख नीटनेटका असून स्वत: प्रसन्न राहून सर्वांशी प्रेमाने वागत आहे त्याचप्रमाणे वर्गातील वातावरण प्रसन्न व आनंदी ठेवत आहे. | ❍ शिक्षक शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्या-साठी नियमित व्यायाम/योगासने/प्राणायाम/ध्यान करत आहेत. |
| | | ब | ❍ शिक्षक विविध स्तरांवरील शिक्षक प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक/शैक्षणिक कार्यशाळा/परिसंवाद/चर्चासत्रे/प्रदर्शने/विविध स्पर्धा इ.मध्ये सक्रिय सहभाग घेत आहे. | ❍ शिक्षक नवोपक्रम/कृतिसंशोधन/ शोधनिबंध लेखन करत आहेत. | ❍ शिक्षकाने स्वत:ची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता वाढविली आहे./व्यवसायाशी पूरक इतर कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रमाणित अभ्यास-क्रम, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यां-साठी असणारा अभ्यासक्रमपूर्ण करून प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. |
| | | क | ❍ शिक्षक आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संदर्भग्रंथ व अवांतर साहित्याचं वाचन करून (दरमहा किमान २ पुस्तके) टिपण ठेवत आहे व त्याचा दैनंदिन अध्या-पनात वापर करत आहे. | ❍ शालेय हस्तलिखित/बाल-साहित्य/ नियतकालिके/वर्तमानपत्रे इ.मध्ये शैक्षणिक लेखन करत आहे. | ❍ चालू शैक्षणिक वर्षात स्व-लिखित पुस्तकाचे प्रकाशन केले आहे. |
| ३४ | विद्यार्थी उपस्थिती | | ❍ शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांची कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक माहितीची नोंद ठेवलेली आहे व त्याआधारे उपस्थिती वाढविण्या-साठी प्रयत्न केला जात आहे. | ❍ गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालक भेटी वेळीच घेतल्या जातात व गैरहजर विद्यार्थ्यांना व्यक्तिगत व शाळापातळीवरून उपस्थित राहण्यासाठी आवश्यक ती मदत मिळवून दिली जात आहे. | ❍ विविध प्रोत्साहन-पर उपक्रमाद्वारे किमान ९५% उपस्थिती राखली जात आहे. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ३५ | वर्ग व्यवस्थापन | | ❍ शिक्षक अध्ययन घटकाला अनुकूल होईल अशी बैठक व्यवस्था करीत आहे. (उदा. गोलाकार,अर्ध गोलाकार, सरळ) | ❍ विद्यार्थ्यांचे स्वयंअध्ययन व सहाध्यायी अध्ययनासाठी अध्ययन पातळीनुसार किंवा संमिश्र गट केले असून विषयानुसार त्यामध्ये बदल केला जात आहे. | ❍ शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने अभ्यास-विषयक व सह-शालेय उपक्रमांचे स्वत:नियोजन करून त्यांची अंमलबजावणी करत आहेत. |
| ३६ | अध्ययन-अध्यापन प्रक्रिया | अ | ❍ शिक्षकाने प्राथमिक स्तरावरील (इ.१ली ते ८वी) अभ्यास-क्रमाचा अभ्यास केला असून अभ्यासक्रमाची सर्वसामान्य उद्‌दिष्टे व विषयनिहाय उद्‌दिष्टे माहीत आहेत. तसेच शिक्षक विहित नमुन्यात नियमितपणे दैनंदिन टाचण काढून शैक्षणिक साहित्यासह अध्यापन करीत आहेत. | ❍ अभ्यासक्रमाच्या नियोजनाप्रमाणे केलेल्या पूर्ततेची नोंद वेळोवेळी रजिस्टरमध्ये केली जात आहे व त्या आधारे नियोजनामध्ये योग्य ते बदल केले जात आहेत. | ❍ सर्व विषय शिकविताना विविध अध्ययन अनुभवांची योजना करून त्याप्रमाणे अध्यापन केले जाते व कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण हे विषय इतर विषयांना जोडून शिकवित आहेत. |
| | | ब | ❍ स्वत: वार्षिक मासिक, साप्ताहिक व घटक नियोजन केले आहे. | — | — |
| | | क | ❍ टीएलएम व इतर अनुदान/ लोकसहभाग/ स्वखर्चाने शिक्षक स्वत: सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मदतीने शैक्षणिक साहित्य निर्माण करत आहे व त्याचे स्वतंत्र नोंद-रजिस्टर उपलब्ध आहे. | ❍ शैक्षणिक अनुभव देण्यासाठी टु.इन.वन./ दूरदर्शन संच इ. साधनांचा वापर करीत आहेत. | ❍ शाळेत व्ही.सी.डी. प्लेअर/डिजिटल कॅमेरा/संगणक/ इंटरनेट/ एल.सी.डी. इत्यादी साधनांचा वापर करीत आहेत. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ३७ | अपेक्षित मूलभूत कौशल्यां-बाबत विद्यार्थ्यांची प्रगती | अ | ❍ सर्व विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळींनुसार समजपूर्वक वाचन करत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळींनुसार वाचन करतात व त्यातील आशय स्वत:च्या शब्दांत सांगत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी आवडीने अवांतर वाचन करत आहेत, वाचलेले प्रसंग, संवाद, गोष्टी स्वत:च्या शब्दांत सांगत आहेत. |
| | | ब | ❍ सर्व विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळींनुसार अनुलेखन व श्रुतलेखन करत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळीनुसार स्व-अनुभवातील परिचित/आवडीच्या विषयावर आधारित स्वत:च्या शब्दांत लेखन करीत आहेत. | ❍ विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखनावर आधारित हस्त-लिखित तयार केले जात आहे. |
| | | क | ❍ सर्व विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळीनुसार संख्यांचे वाचन, लेखन करत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी त्या त्या इयत्तेच्या पातळीनुसार संख्यावरील मूलभूत गणिती क्रिया करत आहेत. (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इ.) | ❍ किमान ९०% विद्यार्थी त्या त्या इयत्तेला अपेक्षित दैनंदिन व्यवहारावर आधारित शाब्दिक उदाहरणे योग्य मांडणी करुन सोडवत आहेत, तसेच गणिती संकल्पनांचा व्यवहारामध्ये उपयोग करीत आहेत. |
| | | ड | ❍ सर्व विद्यार्थी वैयक्तिक, कुटुंब, परिसर व निसर्ग यासंबंधीची माहिती/ज्ञान मिळवित आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी वैयक्तिक, कुटुंब परिसर व निसर्ग यासंबंधीची माहिती/ज्ञानाचा त्याच्या दैनंदिन जीवनामध्ये उपयोग करत आहेत. उदा. आरोग्य सवयी, ऊर्जा | ❍ किमान ९०% विद्यार्थी निरनिराळ्या घटनांमागील कार्यकारणभाव सांगत आहेत. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| | | | | साधनांचा काटकसरीने वापर, सार्वजनिक स्वच्छता, वृक्षारोपण/वृक्षसंवर्धन इ. | ❍ त्या त्या इयत्तेला अपेक्षित प्रयोग करून पडताळणी करत आहेत/निष्कर्ष काढत आहेत. ❍ विज्ञान प्रदर्शनात स्वत: साहित्य/उपकरण तयार करून सहभागी होत आहेत. |
| | | इ | ❍ सर्व विद्यार्थी इतिहासातील प्रसंग, माहिती सांगत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी परिसरातील/परिसराबाहेरील संस्था, व्यवसाय तसेच ऐतिहासिक स्थळे यांना भेटी देऊन तसेच संबंधितांच्या मुलाखती घेऊन त्यांची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी मिळून गाव/तालुका/जिल्हा यांचा इतिहास जाणून घेऊन त्यावर आधारित लेखन करत आहेत. |
| | | फ | ❍ सर्व विद्यार्थी परिसर भेटीत पाहिलेल्या ठिकाणांचे/भूभागाचे व भौगोलिक घटनांचे वर्णन स्वत:च्या शब्दांत करीत आहेत/ क्षेत्रभेटीचा अहवाल तयार करत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी गावाचा/ प्रभागाचा प्रमाणित/ अप्रमाणित नकाशा तयार करणे, नकाशा-वाचन तसेच नकाशा भरणे इ. प्रात्यक्षिके करून दाखवित आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने प्रतिकृती/उठावाचे नकाशे तयार केले आहेत. |
| | | ग | ❍ सर्व विद्यार्थी इयत्तेनुसार कला विषयामधील चित्र-शिल्प, नृत्य-नाट्य, गायन-वादन इ. बाबत किमान प्राथमिक माहिती सांगत आहेत. (उदा. वाद्यांचे प्रकार, चित्रांचे प्रकार, नृत्यांचे प्रकार इ.) | ❍ किमान ९०% विद्यार्थी चित्र-शिल्प, नृत्य-नाट्य, गायन-वादन इ. कलांच्या माध्यमातून मुक्त अभिव्यक्ती करीत आहेत. | ❍ किमान ९०% विद्यार्थी आवडी-नुसार एखाद्या कला-प्रकाराचे वर्गात/शाळेत अथवा शाळेबाहेर सादरीकरण करत आहेत. |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| | | ह | ❍ सर्व विद्यार्थी इयत्तेनुसार वैयक्तिक/सांघिक खेळ खेळत असून कौशल्य दाखवत आहेत. इयत्तेनुसार नियमितपणे कवायत, संचलन, मनोरे, योग, प्राणायाम, सूर्य नमस्कार इत्यादींची प्रात्यक्षिके करून दाखवत आहेत. | ❍ सर्व विद्यार्थी आवडीचा खेळ नियमितपणे खेळत आहेत./ विविध स्तरांवरील क्रीडा प्रकार व खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेत आहेत. | ❍ विद्यार्थ्यांची विविध स्तरांवरील क्रीडास्पर्धांसाठी निवड झाली आहे./प्रावीण्य प्रमाणपत्र मिळविले आहे. |
| | | ज | ❍ वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची शालेय आरोग्यमंत्र्याच्या मदतीने आठवड्यातून किमान २ वेळा आरोग्य पाहणी केली जात आहे. | ❍ प्रत्येक वर्गात आरसा, कंगवा, नेलकटर उपलब्ध असून सर्व विद्यार्थी त्याचा वापर करत आहेत. | ❍ वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे ६ संदेश माहीत असून ते नियमितपणे पाळले जातात. |
| | | झ | ❍ सर्व विद्यार्थ्यांनी कार्यानुभव विषयांतर्गत स्थानिक परिस्थिती-नुसार क्षेत्रनिहाय निवडण्यात आलेल्या उपक्रमांनुसार वस्तू तयार केल्या आहेत/ आवश्यक कृती पूर्ण केली आहे. | ❍ किमान ९०% विद्यार्थ्यांनी कार्यानुभवातील काही प्रात्यक्षिके गरजेनुसार परिसरातील कुशल कारागिरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली आहेत. उदा. मातकाम, सुतारकाम, बागकाम इ. | ❍ किमान ९०% विद्यार्थी कार्यानुभव विषयांतर्गत तयार केलेल्या वस्तूंच्या वर्ग/शाळा स्तरांवरील प्रदर्शनात सहभागी होत आहेत. |
| ३८ | शिक्षक-विद्यार्थी विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया | | ❍ वर्गातील सर्व विद्यार्थी गटकार्य/गटचर्चेत सहभागी होत असून आपले विचार, कल्पना नि:संकोचपणे मांडत आहेत. | ❍ वर्गातील सर्व विद्यार्थी गटकार्य/ गटचर्चा करत असताना एकमेकांना प्रश्न विचारत आहेत व उत्तरे न मिळालेल्या प्रश्नांबाबत शिक्षकांशी चर्चा करत आहेत. | — |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| ३९ | मूल्यशिक्षण व जीवनकौशल्य विकसन | | ○ शालेय परिपाठात वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी केले जात आहे. त्यासाठी गटांत विभागणी केली आहे. तसेच पाठ्यक्रमातील मूल्ये व जीवनकौशल्ये शोधून त्यांची यादी तयार केली आहे व त्यास पूरक अध्ययन अनुभव दिले जात आहेत. | ○ मूल्ये व जीवन कौशल्याबाबतच्या अपेक्षित वर्तनबदलांच्या वर्गनिहाय निरीक्षणात्मक नोंदी नियमित ठेवल्या जातात. | ○ सद्यस्थितीमध्ये घडणाऱ्या मूल्यांबाबतच्या घटनांवर भाष्य करतात/चर्चा करतात. |
| ४० | विशेष प्रावीण्यासाठी विविध स्पर्धा सहभाग | | ○ विद्यार्थ्यांची कुवत व कल लक्षात घेऊन निरनिराळ्या स्तरांवरील विविध स्पर्धांमध्ये किमान ७०% विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जात आहे. | ○ शालेय वेळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा/ प्रावीण्य परीक्षासाठी मार्गदर्शन केले जात आहे. | ○ विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी अपेक्षित प्रावीण्य मिळविले आहे./ संपादणूक केलेली आहे. |
| ४१ | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन | अ | ○ विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निरीक्षणाच्या नोंदी वस्तुनिष्ठ व अर्थपूर्ण रीतीने केल्या जात आहेत. | ○ दैनंदिन नोंदींच्या आधारे विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय बाबी आणि त्रुटी पालकांच्या निदर्शनास आणून दिल्या जात आहेत. | ○ उल्लेखनीय बाबींची दखल घेऊन त्याला प्रोत्साहन दिले जात आहे तसेच त्रुटी दूर करण्यासाठी मार्गदर्शन/उपाय योजले जात आहेत. |
| | | ब | ○ शिक्षक आकारिक मूल्यमापनासाठी निवडलेल्या साधनतंत्राच्या अनुषंगाने अध्ययन अनुभव देत आहेत. | ○ आकारिक मूल्यमापनासाठी निवडलेल्या साधनतंत्रानुसार मूल्यमापन करत आहेत व त्याची नोंद ठेवत आहेत. | ○ विद्यार्थ्यांमध्ये आढळलेल्या त्रुटींचा व त्रुटींमागील कारणांचा शोध घेऊन अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करत आहेत. |
| | | क | ○ संकलित मूल्यमापनासाठी शिक्षकाने तोंडी, लेखी व | ○ संकलित मूल्यमापनासाठीच्या चाचणीमध्ये अपेक्षित सर्व | ○ शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या व इतर |

| अ. क्र. | विकासाचे घटक | | मूल्यमापनाचे निकष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ |
| | | | प्रात्यक्षिक स्वरूपात चाचणी स्वत: तयार केली आहे. | प्रश्न प्रकार, उद्दिष्टे व योग्य भारांश यांचा विचार केला आहे. | विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिका त्यांना अवलोकनास देत आहेत. |
| ४२ | विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक | अ | ❍ सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये क–२ व त्यापेक्षा वरील श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये ब–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी क–१ श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये अ–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी ब–२ श्रेणी प्राप्त केली आहे. |
| | | ब | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये क–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी क–२ श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये अ–२ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी क–१ श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापना–मध्ये अ–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी ब–१ श्रेणी प्राप्त केली आहे. |
| | | क | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये ब–२ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी क–२ श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये अ–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी क–१ श्रेणी प्राप्त केली आहे. | ❍ किमान ५०% विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापना–मध्ये अ–१ श्रेणी प्राप्त केली आहे व उर्वरित विद्यार्थ्यांनी अ–२ श्रेणी प्राप्त केली आहे. |
| | | ड | | | ❍ सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये अ–१ श्रेणी प्राप्त केली आहे. |

## महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०

**महत्त्वाची तत्त्वे :**

१) प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाला शाळेत आणावे, रमवावे, टिकवावे आणि त्याला उत्तम शिक्षण मिळावे.

२) विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाइतकाच सामाजिक, भावनिक आणि क्रियात्मक अंगांचा विकासही महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला या विकासाची संधी मिळावी.

३) प्रत्येक मुलाला त्याच्या आवडीचे, त्याचा आत्मविश्वास वाढवणारे आणि त्याचे जीवन समृद्ध करेल असे गुणवत्तापूर्ण शिक्षण आपुलकीच्या व आनंददायी वातावरणात मिळणे अनिवार्य आहे.

४) केवळ नेमलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे तर प्रत्येक विद्यार्थ्याला अध्ययन विषयाच्या प्रभुत्व पातळीपर्यंत जाण्यासाठी सक्षम बनवणे महत्त्वाचे आहे.

५) विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे एकमेकांशी असणारे नाते, विश्वास, आदर, आपुलकी आणि सहकार्याचे असावे.

६) शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक (मानवी तसेच अमूर्त) घटक विश्वासार्ह व दर्जेदार असावा.

MK

# माझी समृद्ध शाळा

## तक्ता क्र. १ :- विकास घटक निहाय व स्तरनिहाय गुणविभागणी

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| १. | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | शाळा इमारत | १ | २ | ० | ३ |
| २. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | १ | २ | ० | ३ |
| ३. | | स्वच्छतागृह | १ | २ | ० | ३ |
| ४. | | स्वयंपाकगृह/किचनशेड | १ | २ | ० | ३ |
| ५. | | फर्निचर | २ | ४ | ३ | ९ |
| ६. | | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | १ | २ | ० | ३ |
| ७. | | विद्युत सुविधा | १ | २ | ० | ३ |
| ८. | | संरक्षक भिंत | १ | २ | ० | ३ |
| ९. | | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | १ | २ | ३ | ६ |
| १०. | | शालेय बाग | १ | २ | ३ | ६ |
| ११. | | ग्रंथालय | १ | २ | ३ | ६ |
| १२. | | प्रयोगशाळा | १ | २ | ० | ३ |
| १३. | | शाळा सजावट | १ | ० | ० | १ |
| १४. | | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | २ | २ | ० | ४ |
| १५. | | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | १ | २ | ० | ३ |
| १६. | | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | ३ | २ | ० | ५ |
| १७. | | खेळाचे मैदान | १ | २ | ३ | ६ |
| १८. | | शालेय अभिलेख व दप्तर | १ | २ | ० | ३ |
| १९. | | वित्तीय व्यवस्थापन | १ | २ | ३ | ६ |
| २०. | | मुख्याध्यापक | १ | २ | ३ | ६ |
| २१. | | देखभाल दुरुस्ती | १ | ० | ० | १ |
| | | एकूण | २५ | ४० | २१ | ८६ |



२३ K

MK

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| २२. | लोकसहभाग | शाळा व्यवस्थापन समिती | २ | ४ | ३ | ९ |
| २३. | | शिक्षक पालक संघ | १ | २ | ० | ३ |
| २४. | | माता पालक संघ | १ | २ | ० | ३ |
| २५. | | शालेय पोषणआहार समिती | १ | २ | ० | ३ |
| २६. | | शाळा आणि समाज परस्पर संबंध | १ | २ | ३ | ६ |
| | | एकूण | ६ | १२ | ६ | २४ |
| २७. | शैक्षणिक संधीची समानता | मुलींचे शिक्षण | १ | २ | ३ | ६ |
| २८. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे शिक्षण | १ | २ | ३ | ६ |
| २९. | | अनुसूचित जाती/जमातीतील मुलांचे शिक्षण | १ | २ | ३ | ६ |
| ३०. | | अल्पसंख्याक मुलांचे शिक्षण | १ | २ | ३ | ६ |
| ३१. | | शाळाबाह्य मुलांचे शिक्षण | १ | २ | ३ | ६ |
| ३२. | | स्थलांतरित बालकांचे शिक्षण | १ | २ | ० | ३ |
| | | एकूण | ६ | १२ | १५ | ३३ |
| ३३. | शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन | शिक्षक व्यक्तिमत्त्व विकास | ३ | ६ | ९ | १८ |
| ३४. | | विद्यार्थी उपस्थिती | १ | २ | ३ | ६ |
| ३५. | | वर्ग व्यवस्थापन | १ | २ | ३ | ६ |
| ३६. | | अध्ययन-अध्यापन प्रक्रिया | ३ | ४ | ६ | १३ |
| ३७. | | अपेक्षित मूलभूत कौशल्यांबाबत विद्यार्थ्यांची प्रगती | १० | २० | ३० | ६० |
| ३८. | | शिक्षक-विद्यार्थी,विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया | १ | २ | ० | ३ |
| ३९. | | मूल्यशिक्षण व जीवनकौशल्य विकसन | १ | २ | ३ | ६ |
| ४०. | | विशेष प्रावीण्यासाठी विविध स्पर्धा सहभाग | १ | २ | ३ | ६ |
| ४१. | | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन | ३ | ६ | ९ | १८ |
| ४२. | | विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक | ३ | ६ | १२ | २१ |
| | | एकूण | २७ | ५२ | ७८ | १५७ |
| | | एकूण | ६४ | ११६ | १२० | ३०० |

# माझी समृद्ध शाळा

## तक्ता क्र. २ : विकास घटक गुणसंकलन – मुख्याध्यापकांसाठी

शाळेचे नाव : ________________________ स्वयंमूल्यमापन माहे– एप्रिल २०१२

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| १. | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | शाळा इमारत | | | | — | |
| २. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | | | | — | |
| ३. | | स्वच्छतागृह | | | | — | |
| ४. | | स्वयंपाकगृह/किचनशेड | | | | — | |
| ५. | | फर्निचर | अ | | | — | |
| | | | ब | | | | |
| ६. | | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | | | — | |
| ७. | | विद्युत सुविधा | | | | — | |
| ८. | | संरक्षक भिंत | | | | — | |
| ९. | | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | | | | |
| १०. | | शालेय बाग | | | | | |
| ११. | | ग्रंथालय | | | | | |
| १२. | | प्रयोगशाळा | | | | — | |
| १३. | | शाळा सजावट | | | — | — | |
| १४. | | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| १५. | | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | | | | — | |
| १६. | | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| | | | क | | — | — | |
| १७. | | खेळाचे मैदान, साहित्य | | | | | |
| १८. | | शालेय अभिलेख व दप्तर | | | | — | |
| १९. | | वित्तीय व्यवस्थापन | | | | | |
| २०. | | मुख्याध्यापक | | | | | |
| २१. | | देखभाल दुरुस्ती | | | — | — | |
| | | **एकूण ८६ पैकी** | | | | | |

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| २२. | लोकसहभाग | शाळा व्यवस्थापन समिती | अ | | | | |
| | | | ब | | | — | |
| २३. | | पालक शिक्षक संघ | | | | — | |
| २४. | | माता पालक संघ | | | | — | |
| २५. | | शालेय पोषण आहार समिती | | | | — | |
| २६. | | शाळा आणि समाज परस्पर संबंध | | | | | |
| | | **एकूण २४ पैकी** | | | | | |
| | | **एकूण गुण ११० पैकी** | | | | | |

**स्वयंमूल्यमापन केल्याचा दिनांक –**

**स्वाक्षरी :**

**मुख्याध्यापकांचे नाव :**

## शाळेसाठी श्रेणी निश्चितीचे निकष

| टक्केवारी | ० ते ४०% | ४१ ते ५०% | ५१ ते ६०% | ६१ ते ७०% | ७१ ते ८०% | ८१ ते ९०% | ९१ ते १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | ० ते १२० | १२१ ते १५० | १५१ ते १८० | १८१ ते २१० | २११ ते २४० | २४१ ते २७० | २७१ ते ३०० |
| श्रेणी | ड | क–२ | क–१ | ब–२ | ब–१ | अ–२ | अ–१ |

MK

# माझी समृद्ध शाळा

## तक्ता क्र. २ : विकास घटक गुणसंकलन - मुख्याध्यापकांसाठी

शाळेचे नाव : ______________________ स्वयंमूल्यमापन माहे- सप्टेंबर २०१२

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| १. | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | शाळा इमारत | | | | — | |
| २. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | | | | — | |
| ३. | | स्वच्छतागृह | | | | — | |
| ४. | | स्वयंपाकगृह/किचनशेड | | | | — | |
| ५. | | फर्निचर | अ | | | — | |
| | | | ब | | | | |
| ६. | | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | | | — | |
| ७. | | विद्युत सुविधा | | | | — | |
| ८. | | संरक्षक भिंत | | | | — | |
| ९. | | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | | | | |
| १०. | | शालेय बाग | | | | | |
| ११. | | ग्रंथालय | | | | | |
| १२. | | प्रयोगशाळा | | | | — | |
| १३. | | शाळा सजावट | | | — | — | |
| १४. | | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| १५. | | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | | | | — | |
| १६. | | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| | | | क | | — | — | |
| १७. | | खेळाचे मैदान, साहित्य | | | | | |
| १८. | | शालेय अभिलेख व दप्तर | | | | — | |
| १९. | | वित्तीय व्यवस्थापन | | | | | |
| २०. | | मुख्याध्यापक | | | | | |
| २१. | | देखभाल दुरुस्ती | | | — | — | |
| | | **एकूण ८६ पैकी** | | | | | |



२७ K

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| २२. | लोकसहभाग | शाळा व्यवस्थापन समिती | अ | | | | |
| | | | ब | | | — | |
| २३. | | पालक शिक्षक संघ | | | | — | |
| २४. | | माता पालक संघ | | | | — | |
| २५. | | शालेय पोषण आहार समिती | | | | — | |
| २६. | | शाळा आणि समाज परस्पर संबंध | | | | | |
| | | **एकूण २४ पैकी** | | | | | |
| | | **एकूण गुण ११० पैकी** | | | | | |

**स्वयंमूल्यमापन केल्याचा दिनांक –**

**स्वाक्षरी :**

**मुख्याध्यापकांचे नाव :**

## शाळेसाठी श्रेणी निश्चितीचे निकष

| टक्केवारी | ० ते ४०% | ४१ ते ५०% | ५१ ते ६०% | ६१ ते ७०% | ७१ ते ८०% | ८१ ते ९०% | ९१ ते १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | ० ते १२० | १२१ ते १५० | १५१ ते १८० | १८१ ते २१० | २११ ते २४० | २४१ ते २७० | २७१ ते ३०० |
| श्रेणी | ड | क–२ | क–१ | ब–२ | ब–१ | अ–२ | अ–१ |

MK

# माझी समृद्ध शाळा

## तक्ता क्र. २ : विकास घटक गुणसंकलन – मुख्याध्यापकांसाठी

शाळेचे नाव : ________________________________ स्वयंमूल्यमापन माहे– डिसेंबर २०१२

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| १. | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | शाळा इमारत | | | | — | |
| २. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | | | | — | |
| ३. | | स्वच्छतागृह | | | | — | |
| ४. | | स्वयंपाकगृह/किचनशेड | | | | — | |
| ५. | | फर्निचर | अ | | | — | |
| | | | ब | | | | |
| ६. | | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | | | — | |
| ७. | | विद्युत सुविधा | | | | — | |
| ८. | | संरक्षक भिंत | | | | — | |
| ९. | | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | | | | |
| १०. | | शालेय बाग | | | | | |
| ११. | | ग्रंथालय | | | | | |
| १२. | | प्रयोगशाळा | | | | — | |
| १३. | | शाळा सजावट | | | — | — | |
| १४. | | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| १५. | | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | | | | — | |
| १६. | | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| | | | क | | — | — | |
| १७. | | खेळाचे मैदान, साहित्य | | | | | |
| १८. | | शालेय अभिलेख व दप्तर | | | | — | |
| १९. | | वित्तीय व्यवस्थापन | | | | | |
| २०. | | मुख्याध्यापक | | | | | |
| २१. | | देखभाल दुरुस्ती | | | — | — | |
| | | **एकूण ८६ पैकी** | | | | | |

<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">क्षेत्र</th><th rowspan="2" colspan="2">विकासाचे घटक</th><th colspan="3">स्तरनिहाय गुण</th><th rowspan="2">एकूण गुण</th></tr>
<tr><th>स्तर १</th><th>स्तर २</th><th>स्तर ३</th></tr>
<tr><td rowspan="2">२२.</td><td rowspan="7">लोकसहभाग</td><td rowspan="2">शाळा व्यवस्थापन समिती</td><td>अ</td><td></td><td></td><td></td><td rowspan="2"></td></tr>
<tr><td>ब</td><td></td><td></td><td>—</td></tr>
<tr><td>२३.</td><td colspan="2">पालक शिक्षक संघ</td><td></td><td></td><td>—</td><td></td></tr>
<tr><td>२४.</td><td colspan="2">माता पालक संघ</td><td></td><td></td><td>—</td><td></td></tr>
<tr><td>२५.</td><td colspan="2">शालेय पोषण आहार समिती</td><td></td><td></td><td>—</td><td></td></tr>
<tr><td>२६.</td><td colspan="2">शाळा आणि समाज परस्पर संबंध</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">एकूण २४ पैकी</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2">एकूण गुण ११० पैकी</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

**स्वयंमूल्यमापन केल्याचा दिनांक –**

**स्वाक्षरी :**

**मुख्याध्यापकांचे नाव :**

## शाळेसाठी श्रेणी निश्चितीचे निकष

| टक्केवारी | ० ते ४०% | ४१ ते ५०% | ५१ ते ६०% | ६१ ते ७०% | ७१ ते ८०% | ८१ ते ९०% | ९१ ते १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | ० ते १२० | १२१ ते १५० | १५१ ते १८० | १८१ ते २१० | २११ ते २४० | २४१ ते २७० | २७१ ते ३०० |
| श्रेणी | ड | क–२ | क–१ | ब–२ | ब–१ | अ–२ | अ–१ |

# माझी समृद्ध शाळा

## तक्ता क्र. २ : विकास घटक गुणसंकलन – मुख्यध्यापकांसाठी

शाळेचे नाव : ____________________________________ स्वयंमूल्यमापन माहे– एप्रिल २०१३

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| १. | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | शाळा इमारत | | | | — | |
| २. | | विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी सुविधा | | | | — | |
| ३. | | स्वच्छतागृह | | | | — | |
| ४. | | स्वयंपाकगृह/किचनशेड | | | | — | |
| ५. | | फर्निचर | अ | | | — | |
| | | | ब | | | | |
| ६. | | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | | | — | |
| ७. | | विद्युत सुविधा | | | | — | |
| ८. | | संरक्षक भिंत | | | | — | |
| ९. | | कचरा व सांडपाणी व्यवस्थापन | | | | | |
| १०. | | शालेय बाग | | | | | |
| ११. | | ग्रंथालय | | | | | |
| १२. | | प्रयोगशाळा | | | | — | |
| १३. | | शाळा सजावट | | | — | — | |
| १४. | | शैक्षणिक साहित्य उपलब्धता | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| १५. | | शैक्षणिक तंत्रज्ञानाची उपलब्धता | | | | — | |
| १६. | | कला, कार्यानुभव व खेळ साहित्य | अ | | | — | |
| | | | ब | | — | — | |
| | | | क | | — | — | |
| १७. | | खेळाचे मैदान, साहित्य | | | | | |
| १८. | | शालेय अभिलेख व दप्तर | | | | — | |
| १९. | | वित्तीय व्यवस्थापन | | | | | |
| २०. | | मुख्याध्यापक | | | | | |
| २१. | | देखभाल दुरुस्ती | | | — | — | |
| | | **एकूण ८६ पैकी** | | | | | |

| अ.क्र. | क्षेत्र | विकासाचे घटक | | स्तरनिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्तर १ | स्तर २ | स्तर ३ | |
| २२. | लोकसहभाग | शाळा व्यवस्थापन समिती | अ | | | | |
| | | | ब | | | — | |
| २३. | | पालक शिक्षक संघ | | | | — | |
| २४. | | माता पालक संघ | | | | — | |
| २५. | | शालेय पोषण आहार समिती | | | | — | |
| २६. | | शाळा आणि समाज परस्पर संबंध | | | | | |
| | | **एकूण २४ पैकी** | | | | | |
| | | **एकूण गुण ११० पैकी** | | | | | |

**स्वयंमूल्यमापन केल्याचा दिनांक –**

**स्वाक्षरी :**

**मुख्याध्यापकांचे नाव :**

## शाळेसाठी श्रेणी निश्चितीचे निकष

| टक्केवारी | ० ते ४०% | ४१ ते ५०% | ५१ ते ६०% | ६१ ते ७०% | ७१ ते ८०% | ८१ ते ९०% | ९१ ते १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | ० ते १२० | १२१ ते १५० | १५१ ते १८० | १८१ ते २१० | २११ ते २४० | २४१ ते २७० | २७१ ते ३०० |
| श्रेणी | ड | क–२ | क–१ | ब–२ | ब–१ | अ–२ | अ–१ |